<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६४/२००३ मधील निशाणी १०८ खालील आदेश.</u>

(रामचंद्र सकुंडे वि. माधव सकुंडे)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

<u>प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>

२. वादीने प्रस्तुतचा दावा दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवुन वादीचा हिस्सा पृथक करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे काम वादीपैकी वादी क्र. २ सुरेश सकुंडे हे पाहत होते व त्यांनी प्रस्तुत दावा दाखल करते वेळी सर्व आवश्यक माहीती व कागदपत्रांची पुर्तता केली होती. प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. २ हे मयत झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या मृत्युपश्चात सदर दाव्याचे कामकाज वादी क्र. १ तर्फे मुखत्यार पाहत आहेत.

३. प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. १ हे वादीचा दावा मिळकतीतील हिस्सा टाळण्याच्या हेतुने दावा मिळकतीची विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत अशी खात्री लायक माहीती वादीस मिळाली. त्यामुळे वादीतर्फे मुखत्यार यांनी सर्व वडीलोपार्जीत मिळकतींचा ७/१२ उतारा काढला व सदर मिळकती संदर्भात काही व्यवहार झाले आहेत का याची खात्री केली. तसेच दावा मिळकती बाबत प्रतिवादी क्र. १ ने कोणताही तबदीलीचा व्यवहार करु नये म्हणून स्थगीती अर्जा विषयी वकीलांशी चर्चा केली. त्यावेळी प्रस्तुत दाव्याच्या कामी वादी व प्रतिवादी यांची मौजे अंबवडे ता. कोरेगांव येथील गट नं. ३५१ ही मिळकत दाव्याच्या कामी सामील करण्याचे राहुन गेले आहे असे वादी तर्फे मुखत्यार यांच्या लक्षात आले. प्रस्तुत दाव्याच्या कामी सर्व वडीलोपार्जीत मिळकतींचे एकाच वेळी वाटप होवुन

मिळण्यासाठी वादी गट नं. ३५१ ही दाव्यामध्ये समाविष्ठ करु इच्छीतात.

४. वादीच्या मते प्रस्थावीत दुरुस्ती ही दाव्याच्या अंतीम निकालासाठी आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती वादी तर्फे करण्यात आली.

५. प्रतिवादी यांनी निशाणी १८२ वर त्यांचे म्हणणे दाखल केले व अर्जातील कथनांना तीव्र आक्षेप नोंदविला. प्रतिवादी क्र. १ च्या मते वादीचा कुळ मुखत्यार दिपक सकुंडे यांचे कुळ मुखत्यारपत्र अस्तीत्वात नसल्याने सदरचा अर्ज हा रद्द होण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांचा पुरावा सुरु झालेला आहे. अशा परिस्थीतीत वादीने कोणतीही तत्परता दाखविलेली नाही हे स्पष्ट होते. अर्ज वादी दुरुस्त करु पाहत असलेला मजकुर वादी यांना दावा दाखल करण्यापुर्वी माहीती असल्याचे वादीच्या कथनावरुन दिसुन येते. प्रस्तुत दुरुस्ती करण्यापुर्वी वादीने दाव्यामध्ये अनेक वेळा दुरुस्ती केल्या आहेत. अशा परिस्थीतीत दावा दाखल करताना प्रस्तावीत मिळकत दाव्यामध्ये का समाविष्ठ केली नाही याचे कोणतेही स्पष्टीकरण वादीने दिलेले नाही. वादीने यथायोग्य तत्परता सदरचा अर्ज दाखल करताना केलेली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ तर्फे करण्यात आली.

६. वरीलप्रमाणे वादी चा अर्ज त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे व इतर कागदपत्रे पाहता तसेच वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.न. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांनी दावा दुरुस्तीसाठी योग्य व संयुक्तीक कारण दिले आहे का ? | होय. |
| २ | नियोजीत दावा दुरुस्ती ही दाव्याचा अंतीम निकाल करण्यास मदत करणारी आहे का? | होय. |
| ३. | काय आदेश? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमान्सा

**मुद्दा क्र. १ व २ करीता–**

७. वरील दोन्ही मुद्दे संलग्न असल्यामुळे ते एकत्रीत विचाराधीन घेतलेले आहेत.

८. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा वाटपासाठी व त्यांचा हिस्सा अलग व तुटक करुन मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ याने त्याची कैफियत दाखल करुन वादीच्या दाव्यास आक्षेप नोंदविलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रस्तुत अर्जाने वादी हा दाव्यामध्ये मौजे अंबवडे येथील गट नं. ३५१ ही मिळकत दाव्यामध्ये समाविष्ठ करु इच्छीतो. प्रतिवादीच्या मते वादीला यापुर्वी सदर मिळकतीची माहीती होती. त्यामुळे वादीने सदर अर्जात योग्य व संयुक्तीक कारण दिले नाही.

९. प्रस्तुत प्रकरणात नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, वादीने त्यांच्या दाव्यामध्ये किसन व रामचंद्र ही मुले नोकरी निमीत्त परगावी असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे वादीने त्याच्या अर्जामध्ये त्याला प्रस्तावीत वाद मिळकतीची माहीती नव्हती या

कथनांमध्ये तथ्य असल्याचे दिसुन येते. तसेच वादीने त्याच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे वादीने अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तीक वाटते.

१०. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने त्याच्या युक्तीवादाला दुजोरा देण्यासाठी ***विद्याबाई व इतर वि. पद्मलता व इतर (ए. आय. आर २००९ सुप्रिम कोर्ट १४३३)*** या न्यायनिर्णयाचा दाखला दिला आहे. वरील न्यायनिर्णयामध्ये प्रतिवादींनी कैफियत दुरुस्तीचा अर्ज दाखल केला होता. त्याच्यामध्ये त्याने एकदमच नविन केस उभा केली होती. तसेच प्रतिवादीला प्रस्तावीत कैफियतीमध्ये केलेल्या कथनांची पुर्वीच माहीती होती. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने खालील न्यायालयाने दिलेला निर्णय हा कायम ठेवला होता. परंतु, प्रस्तुत प्रकरणात वादीच्या कथनांवरुन त्याने सदर दुरुस्तीस योग्य व संयुक्तीक कारण दिल्याचे दिसुन येते. त्यामुळे वरील न्यायनिर्णयातील निष्कर्ष याकामी लागु पडत नाहीत.

११. प्रस्तुत प्रकरणात नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, वादी हा प्रस्तावीत दुरुस्तीने नविन मिळकत दाव्यामध्ये समाविष्ठ करु इच्छीतो. वाटपाच्या दाव्यामध्ये सर्व मिळकतीबाबत एकाच प्रकरणात निर्णय होणे अपेक्षीत आहे. त्यामुळे केवळ अर्ज देण्यास उशीर झाला म्हणून वादीला त्याच्या हक्कापासुन वंचीत ठेवता येणार नाही. दाव्यातील खरेखुरे प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रस्तावीत दुरुस्तीस परवानगी देणे आवश्यक आहे. प्रस्तावीत दुरुस्ती ही प्रतिवादीवर अन्यायकारण नाही. प्रतिवादीला वादीच्या दुरुस्तीवर म्हणणे देण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीचे प्रस्तावीत दुरुस्तीमुळे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीने अर्जामध्ये योग्य व संयुक्तीक कारण दिलेले आहे असे म्हणावे लागेल. तसेच प्रस्तुत दाव्यातील खरेखुरे प्रश्न निकाली काढण्यासाठी

प्रस्तावीत दुरुस्ती ही आवश्यक आहे. वादीने सदर अर्ज दाखल करण्यास जो उशीर केला आहे त्याबद्दल वादीवर खर्च बसविणे न्यायोच्चीत होईल. सबब, मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र. ३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो .

**आदेश.**

१. निशाणी १०८ वरील अर्ज १०००/– रुपयांच्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावीत दुरुस्ती मुदतीत करावी. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2022.03.03 18:07:52 +0530

कोरेगाव

दि. ०३/०३/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.